# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

*(आस्थापना विभाग)*


एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२२६५९२


क्र. गो.वि/आस्था/223/२०१७ दि. : 23/01/२०१७

## परिपत्रक

संदर्भ :–१.कक्ष अधिकारी यांचे पत्र क्रं.संकीर्ण–२०१६/प्र.क्रं.१७०/२०१६, आस्था–२,दि.२२/१२/२०१६

विद्यापीठातील संलग्नीत सर्व महाविदयालयांना सुचित करण्यात येते की, संदर्भिय पत्रानुसार लवाद प्रकरणाचा जलद निपटारा होण्याकरिता संस्थात्मक लवाद धोरण महाराष्ट्र राज्यास लागू करण्यात आले असून सदर "संस्थात्मक लवाद धोरण" परिशिष्ट –अ प्रमाणे शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुसार अमलबजावणी करण्यात यावी. करिता माहितीस्तव सादर.

**सहपत्र:–**
१.शासनाचे संदर्भिय पत्र.

(दिपक एस. जुनघरे)
कुलसचिव(का)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सो " संस्थात्मक लवाद धोरण " महाराष्ट्र राज्यास लागू करण्याबाबत... या विषयाबाबतचे विधी व न्याय विभाग, क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२०/का-१९, दि.१३ ऑक्टोबर, २०१६ रोजीचा शासन निर्णय.

---

पृष्ठांकन क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र. १७०/२०१६/आस्था-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दूरध्वनी क्र.२२८५५७६६,
दिनांक २२.१२.२०१६

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 15 दि. 2.1.17
जावक क्र. 77 दि. 3.1.17

प्रति,

मा.प्रधान सचिव ( उच्च व तंत्रशिक्षण ), यांचे स्वीय सहायक,
विभागातील सर्व उपसचिव ( महाविद्यालयीन शिक्षण/विद्यापीठ शिक्षण/तंत्रशिक्षण/कला/ ग्रंथालये ),उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
संचालक ( उच्चशिक्षण/तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालय ), महाराष्ट्र राज्य.
कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे,महाराष्ट्र राज्य.

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 45 दि. 3.1.17
जावक क्र. ...... दि. ......

( त्यांना विनंती करण्यात येते की,सोबतच्या शासन निर्णयातील तरतुदी आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या /अधिका-यांच्या निदर्शनास आणून त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी)

( रा.वि.जाधव )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

कार्यासन आस्था-२ संग्रहार्थ.

Dr. Dube DR
3/1/17

श्री नरोटे
3/1/17

सर्व विभागाला अवगत करावे.

C:\Users\shirish.padolya\Documents\क्रCR_१७०_२०१६.docx

21 OCT 2016

"संस्थात्मक लवाद धोरण"
महाराष्ट्र राज्यास लागू करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**विधि व न्याय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण - २०१६ / प्र. क्र. २०/ का - १९.**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई
दिनांक. १३ ऑक्टोबर, २०१६

**प्रस्तावना :**

लवादावर होणार प्रचंड खर्च कमी करण्याकरिता तसेच लवाद प्रकरणातील प्रलंबन कालावधी कमी करण्याकरिता तंटा सोडविण्याची योग्य, गतिमान व कमी खर्चिक पद्धत अवलंबून लवाद प्रकरणांचा जलद निपटारा होण्याकरिता "संस्थात्मक लवाद धोरणा" च्या मसुद्यावर दिनांक २७ सप्टेंबर, २०१६ च्या मंत्रिमंडळामध्ये चर्चा होऊन सदर धोरण मान्य करण्यात आले. महाराष्ट्र राज्यास "संस्थात्मक लवाद धोरण " लागू करून सदर धोरण निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

लवाद प्रकरणांचा जलद निपटारा होण्याकरिता संस्थात्मक लवाद धोरण महाराष्ट्र राज्यास लागू करण्याचे मान्य करण्यात आले असून सदर "Institutional Arbitration Policy", 'Annexure -A' व "संस्थात्मक लवाद धोरण " 'परिशिष्ट - अ' प्रमाणे या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१६१०१३१७३१४०४९१२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

Rajendra D Sawant

Digitally signed by Rajendra D Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6c5df19Bd5B8de75e335db20487f4df45c73 e6e4ca5875cd77fd0b1924a3fdf8, cn=Rajendra D Sawant
Date: 2016.10.13 17:49:44 +05'30'

**(राजेंद्र सावंत )**
**विधि सल्लागार-नि-सहसचिव**

प्रति ,

१) राज्यपालांचे सचिव
२) मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
३) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक

४) मुख्य सचिव , महाराष्ट्र राज्य मुंबई
५) सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग
६) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
७) सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय , मुंबई
८) सर्व जिल्हाधिकारी
९) अध्यक्ष विधानसभा, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय , मुंबई
१०) सभापती, विधान परिषद, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय , मुंबई
११) विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय , मुंबई
१२) महाप्रबंधक, उच्च न्यायालय मुंबई
१३) महाधिवक्ता महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे स्वीय सहायक
१४) सरकारी वकील, उच्च न्यायालय, अपील शाखा, रिट सेल मुंबई
१५) सरकारी वकील, उच्च न्यायालय, अपील शाखा,मुंबई
१६) सरकारी वकील, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
१७) निवडनस्ती

## ANNEXURE -A

## POLICY FOR ARBITRATION AS A PREFERRED MODE OF DISPUTE RESOLUTION

Whereas the Government of Maharashtra is actively pursuing the ambitious project of establishing an International Financial Centre in Mumbai, the commercial capital of India with Huge strategic advantages and high business potential;

Whereas an efficient regime of enforcement of contracts is a vital and indispensable component of a vibrant business environment and financial system, and an ideal and cost effective arbitration set up is a prime tool of enforcement of contracts and resolution of disputes;

Whereas the Law Commission of India in its 246th report on Amendments to Arbitration and Conciliation Act, 1996 has made certain recommendations with a view to introduce fairness, speed and economy in the resolution of disputes through arbitration; bring arbitration practice in India in conformity with international principles; and reduce extensive judicial intervention in arbitration matters, and thereby stem the gradual, though steady, shift away from India as a preferred seat for international commercial arbitrations in favour of more investor-friendly jurisdictions such as Singapore, Hong Kong and London;

Whereas the Government of India has also taken the cognizance of the problems of excessive judicial intervention in arbitration proceedings and has emphasised the need to establish and popularize institutional arbitration in India, to make it at par with international standards;

Whereas the Supreme Court of India, in the case of Union of India vs. Sing Builders Syndicate [(2009) 4 SCC 523], has also underscored the need to find out an urgent solution to the huge cost element in arbitration and save arbitration from the arbitration cost and observed that institutional arbitration has provided a solution as the Arbitrator's fees is not fixed by the Arbitrators themselves on case to case basis, but is governed by a uniform rate prescribed by the institution under whose aegis the Arbitration is held;

Whereas the Government of India has framed National Litigation Policy to reduce average pendency time from 15 to 3 years, which stresses the need to encourage and strengthen arbitration as an alternative dispute resolution mechanism;

Whereas the Government of Maharashtra has framed the State Litigation Policy with a view to make the shift from the Government being a compulsive litigant to an efficient and responsible litigant, reduce the Government litigations in courts and thus encourage and promote the greater use of alternative dispute resolution mechanism including arbitration;

Whereas, it has been noticed that in most of the Government contracts the arbitration Clauses are in the realm of ad-hoc arbitration and there is no uniformity in either the covenants of dispute resolution or the appointment of Arbitrators.

Now, the Government of Maharashtra, therefore, proposes to formulate a policy to promote, propagate and patronize institutional arbitration as preferred mode of dispute resolution, a vital part of the ease of enforcement of contracts and reduce the litigation, and institutional arbitration as the game changer and thereby give a fillip to establishment of International Financial Centre at Mumbai.

## INTRODUCTION

Arbitration, as a mode of dispute resolution, has not succeeded in commanding the place of pride in the Indian system of dispute resolution. Arbitration in India, like adjudication, suffers on account of delay and costs. Excessive judicial intervention has further eroded the efficacy of arbitration as an informal, swift and cost effective specialized method of dispute resolution.

The shortcomings observed in the working of the Arbitration and Conciliation Act, 1996 (which replaced the Arbitration Act, 1940), led to 176th Report of Law Commission of India on the amendments in the Arbitration and Conciliation Act, 1996. In 2004, 'Justice Saraf Committee On Arbitration' was appointed, which gave a detailed report on 29.01.2005. The Justice Saraf Committee Report on Arbitration And Conciliation (Amendment) Bill 2003 was referred to Department Related Standing Committee on Personnel, Public Grievance, Law and Justice. The Committee stressed upon the need for popularizing institutional arbitration in India and called for establishment of an institution in our country which would be along international standard. The Bill came to be ultimately withdrawn.

## INSTITUTIONAL ARBITRATION IN INDIA

Law Commission of India in its 246 report has noted that the spread of Institutional Arbitration in India is minimal and has not really kick started. The Commission has noted the establishment and working of Delhi High Court International Arbitration Centre (2009) the Punjab-Haryana High Court Arbitration Centre (2014), Indian Council of Arbitration in co-ordination with FICCI and Nani Palkhiwala Arbitration Centre in Chennai.

## INSTITUTIONAL ARBITRATION Centre IN MUMBAI

The necessity of an Institutional Arbitration Centre in Mumbai as a part and parcel of International Financial Centre can hardly be overstated. A Financial Centre attached Arbitration Institute is both elementary and advantageous. The flight of arbitration disputes where both parties to the dispute are the entities registered in India, leave alone where one of the parties is so registered, to a seat of arbitration in other countries makes it obligatory to have a world class Institutional Arbitration Centre in Mumbai.

## POLICY INITIATIVES

i. To start with, the Government of Maharashtra propose to promote institutional arbitration as a matter of its stated policy.

ii. The dispute resolution mechanism incorporated in the various contracts executed by or on behalf of the Government of Maharashtra indicate a profound diversity in approach. In one case there is a method of adjudication by an officer of the Government. In another case it is arbitration by an officer of the Government. In quite a few cases, there is both adjudication and arbitration by the officers of the Government. In few other cases, there is a standard arbitration clause to arbitrate the dispute in accordance with the provisions of the Arbitration and Conciliation Act, 1996. Disparity is required to be addressed and uniform regime of resolution of dispute through arbitration is therefore proposed.

iii. In all the Government contracts i.e. the contracts and agreements executed by or on behalf of Governor, the State Government companies and other Government corporations and bodies, shall have a recommended standard institutional

The Law Commission of India in its 246th report and the Supplementary to the said Report made concrete suggestions and recommendations on Amendments on Arbitration and Conciliation Act, 1996. The Parliament has passed the Arbitration and Conciliation (Amendment) Act, 2015 which came into force on and from 23.10.2015.

## INSTITUTIONAL ARBITRATION VS. AD-HOC ARBITRATION

As noted by the Law Commission of India in its 246th report, Arbitration may be conducted ad-hoc or under institutional procedure and rules. In ad-hoc arbitration, which is in vogue in India, the parties have the choice of drafting their own rules and procedure which fit the needs of their dispute. The choice of the arbitrator in this method either entails huge cost and delay or the competency to arbitrate is seriously compromised.

Institutional Arbitration, on the other hand, is one in which a specialized institution with a permanent character intervenes and assumes the functions of aiding and administering the arbitration process, as provided by the rules of such institution. The institutional arbitration has clear advantages. Firstly, the arbitration institution may provide qualified arbitrators empanelled with the institution. Secondly, the rules and procedure of the arbitral proceedings are determined by the institution. Thirdly, the arbitral institution provides the administrative support in the form of Secretariat and staff to aid the arbitrator. Fourthly, the arbitration by the arbitral institutes may save the parties of huge cost of fees, which may be pre-determined, having regard to the nature of dispute and the services of the arbitrators to be availed.

## INSTITUTIONAL ARBITRATION AT INTERNATIONAL LEVEL

The Governments, in various jurisdictions, have committed themselves to establish and promote International Arbitration Centres. Singapore International Arbitration Centre, Kuala Lumpur Regional Centre for Arbitration, Dubai International Financial Centre-London Court of International Arbitration Centre and Hong Kong International Arbitration Centre are few of the notable international arbitration Centres which have come up with the support of the respective Governments.

arbitration clause, where the commercial value of the contract is ₹5,00,00,000/- (Rupees five crore) and above, incorporated to the effect that the dispute shall be referred to a recognized Indian Arbitration Institutes (model clause at Annexure 'A-1').

iv. With the consent of the other parties to the contracts and agreements the existing agreements and contracts be suitably amended/altered as regards the dispute resolution mechanism so as to provide that the dispute be referred to the recognized Indian Arbitration Institutes, utilizing the recommended arbitration clause, in substitution to the existing clause(s).

v. Even in the cases where the arbitration has commenced or is about to commence, the parties shall have the option to move over to the proposed Institutional Arbitration mechanism.

vi. Ordinarily, the contracts and agreements shall not contain a clause of referring the dispute to a Arbitral Tribunal comprising the serving officers of the Government.

vii. The Arbitration Institutes to be recognized by the Government of Maharashtra shall frame the Rules which incorporate best practices from around the world, and are conducive for just, cost effective and time bound resolution of the dispute.

viii. The Arbitrators to be appointed by the said Arbitration Institutes shall be persons of high caliber, impeccable integrity and specialized knowledge.

ix. The Arbitration Institutes shall evolve a fair and transparent procedure to attract best talent for the Arbitration Centre.

x. The Government of Maharashtra may facilitate the Recognised Arbitration Institutes for having requisite infrastructure including avant-garde communication and information technology and inviting ambience for the said institutes.

xi. The Government of Maharashtra shall grant recognition to an Arbitral Institute based on the following criteria:

   i. The Arbitral Institute shall be an Indian legal entity having its head office registered in Maharashtra.

ii. The Arbitral Institute shall frame Rules which incorporate best practices from around the world, and are conducive for just, cost effective and time bound resolution of the dispute.

iii. The Arbitrators to be appointed by the said Arbitration Institute shall be persons of high caliber, impeccable integrity and specialized knowledge.

iv. the Arbitral Institute shall have hearing facilities that are of international standards.

xii. The Government may devise an appropriate method to invite applications from the interested Arbitral Institutes fulfilling the above criteria.

xiii. The Government reserves the right to derecognise an Arbitral Institute if it is satisfied that the Institution is not rendering the services in an effective, fair and transparent manner or is abusing the privilege of recognition or for any other sufficient cause.

xiv. Every endeavor shall be made by the recognized Arbitration Institutes as well as the Government of Maharashtra to ensure that the said arbitration Centres avail themselves of the services of Arbitrators of International standing and their facilities are of international standards. At the same time, the Government of Maharashtra, though fully instrumental in promoting and supporting the recognized Arbitration Institutes, will ensure that the functional independence and impartiality of the Arbitration Institutes is not affected.

# ANNEXURE 'A - 1'

## MCIA MODEL CLAUSE

Any dispute arising out of or in connection with this contract, including any question regarding its existence, validity or termination, shall be referred to and finally resolved by arbitration in accordance with the Arbitration Rules of the Mumbai Centre for International Arbitration ("**MCIA Rules**"), which rules are deemed to be incorporated by reference in this clause.

The seat of the arbitration shall be _______________.

The Tribunal shall consist of [one/three] arbitrator(s).

The language of the arbitration shall be English.

The law of this arbitration agreement shall be _______________.

The Law Governing the contract shall be _______________.

परिशिष्ट – अ

## वाद निवारणाची एक अधिक संयुक्तीक पध्दती असलेल्या लवादाचे प्रारुप धोरण

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन प्रचंड महत्वाची उपयुक्तता व मोठया प्रमाणात वाणिज्यिक क्षमता असलेली भारताची वाणिज्यिक राजधानी मुंबई येथे एक आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र स्थापन करण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा सक्रियपणे पाठपुरावा करीत आहे,

ज्याअर्थी , करारांची कार्यक्षम अंमलबजावणी ही वर्धनक्षम व्यावसायिक वातावरणाचा आणि वित्तीय व्यवस्थेचा एक मूलभूत व अनिवार्य घटक आहे व आदर्श व खर्चाच्या दृष्टीने परवडणारी लवाद संरचना ही, करारांची अमलबजावणी करण्याचे आणि वाद सोडविण्याचे एक प्रमुख साधन आहे ;

ज्याअर्थी, भारतीय विधी आयोगाने लवाद व समेट अधिनियम१९९६ यामध्ये सुधारणा करण्याबाबतच्या आपल्या २४६ व्या अहवालामध्ये, लवादामार्फत वाद सोडविण्याची एक योग्य, न्याय्य, गतीशील आणि किफायतशीर पध्दती सुरु करण्यासाठी, आंतरराष्ट्रीय तत्वांशी सुसंगत असलेली लवाद पध्दती भारतामध्ये आणण्यासाठी व लवाद प्रकरणामध्ये होत असलेला व्यापक स्वरुपाचा न्यायिक हस्तक्षेप कमी करण्याकरिता सिंगापूर, हॉगकॉग आणि लंडन यांसारख्या देशांप्रमाणे भारतात देखील अधिकाधिक गुंतवणूकीस अनुकूल व गुंतवणूक योग्य अधिकारिता असणारी आंतरराष्ट्रीय वाणिज्यिक लवादाची एक अधिमान्य यंत्रणा उभारण्यासाठी हळूहळू परंतु सातत्यपूर्ण बदलांद्वारे जोरदार प्रयत्न करणे शक्य होईल; काही विवक्षित शिफारशी केलेल्या आहेत;

ज्याअर्थी, भारत सरकारने देखील लवाद प्रक्रियेमधील कार्यवाही मधील अत्याधिक न्यायिक हस्तक्षेपाच्या समस्यांची दखल घेतली असून लवादास आंतरराष्ट्रीय मानकांच्या समतुल्य बनवण्यासाठी भारतामध्ये संस्थात्मक लवादाची स्थापना करण्याच्या आणि त्यास लोकप्रिय करण्याच्या गरजेवर भर दिला आहे;

ज्याअर्थी, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने, भारताचे संघराज्य-विरुद्ध-सिंग बिल्डर्स सिंडीकेट [(२००९) ४ SSC ५२३] या प्रकरणामधे, लवाद प्रकरणांमध्ये होणाऱ्या प्रचंड खर्च

संबंधात तातडीने उपाय शोधून काढण्याची आणि या खर्चापासून लवाद सुरक्षित करण्याची गरज अधोरेखीत केली असून , संस्थात्मक लवादामध्ये, लवादाचे शुल्क हे, प्रकरणपरत्वे स्वत: लवाद निश्चित करीत नाही तर ज्या संस्थेच्या अंतर्गत धारण केला जातो त्या संस्थेने विहित केलेल्या एकसमान दराने शुल्क नियंत्रित केले जात असल्याने, संस्थात्मक लवाद हा उपाय आहे असे प्रतिपादन केले.

ज्याअर्थी, भारत सरकारने, विवादांची प्रलंबितता सरासरी १५ वर्षांवरून ३ वर्षांपर्यंत कमी करण्यासाठी राष्ट्रीय वाद धोरण आखले असून त्यात, एक पर्यायी वाद निवारण यंत्रणा म्हणून लवादास उत्तेजन देण्याच्या व त्याचे बळकटीकरण करण्याच्या गरजेवर भर दिला आहे;

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, शासनाचे एक अनिवार्य पक्षकारातून, कार्यक्षम व जबाबदार पक्षकारामध्ये रुपांतर करण्यासाठी शासनाचा संदर्भातील न्यायालयातील वाद कमी करण्याकरिता व लवादासह पर्यायी वाद निवारण यंत्रणेचा मोठया प्रमाणात वापर करण्यास चालना देण्याच्या दृष्टीने, राज्य वाद धोरण आखले आहे;

ज्याअर्थी, असे निदर्शनास आले आहे की, बहुतांश शासकीय करारांमध्ये लवाद बाबतचा तरतुदी, तदर्थ लवादाच्या स्वरुपात असतात आणि त्यात एकतर विवादावरील निर्णयाच्या प्रसंविदेमध्ये किंवा लवादांच्या नियुक्तीमध्ये एकसमानता नसते;

त्याअर्थी, आता महाराष्ट्र शासन, वाद सोडविण्याची एक अधिमान्य पध्दती म्हणून आणि करारांच्या अंमलबजावणीच्या सुलभतेचा आणि वाद कमी करण्याचा एक मुलभूत भाग म्हणून संस्थात्मक लवादाला चालना देणे, त्याचा प्रचार करणे, त्याला आश्रय देणे याकरिता आणि आमूलाग्र बदल घडविणारी यंत्रणा म्हणून संस्थात्मक लवादास आणि त्याद्वारे मुंबई येथे आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्राची स्थापना करण्यास उत्तेजन देण्यासाठी एक धोरण तयार करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

## प्रास्ताविक

वाद सोडविण्याची एक पध्दती म्हणून "लवाद" हा भारतीय वाद सोडविण्याच्या पध्दतीमध्ये आद्यपद मिळवण्यात यशस्वी ठरलेला नाही. भारतामध्ये लवाददेखील न्यायप्रणालीप्रमाणे विलंब आणि खर्च या बाबींमुळे ग्रस्त आहे. लवाद प्रक्रियेत न्यायालयच्या व्यापक प्रमाणात होणाऱ्या हस्तक्षेपामुळे एक अनौपचारिक, गतिमान व खर्चाच्या दृष्टीने परवडणारी वाद निवारणाची विशेष पध्दती म्हणून लवादाची उरलेली गुणकारीता आणखी कमी झाली आहे.

लवाद अधिनियम, १९४० ची व्यावृती करुन त्याऐवजी करण्यात आलेला अंमलबजावणी करताना, निदर्शनास आलेल्या त्रुटीं लक्षात घेवून भारताच्या विधी आयोगाने त्याच्या १७६ व्या अहवालात लवाद व समेट अधिनियम, १९९६ मध्ये सुधारणा करण्याबाबत शिफारस केली आहे. सन २००४ मधे, लवादाबाबत अभ्यास करण्याकरिता "न्यायमूर्ती सराफ समिती" नेमली होती व समितीने दिनांक २९/०१/२००५ रोजी आपला सविस्तर अहवाल सादर केला. न्यायमूर्ती सराफ समितीचा लवाद व समेट (दुरुस्ती) विधेयक, २००३ वरील अहवाल कर्मचारीवर्ग, सार्वजनिक तक्रारी, कायदा आणि न्याय याबाबतचा स्थायी समितीकडे संदर्भीत केला. या समितीने भारतामधे संस्थात्मक लवाद लोकप्रिय करण्याच्या गरजेवर भर दिला आणि आपल्या देशात आंतरराष्ट्रीय मानके असलेली एक संस्था स्थापन करण्याची मागणी केली. मात्र हे विधेयक अंतिमत: मागे घेण्यात आले.

भारताच्या विधी आयोगाने, आपल्या २४६ व्या अहवालात आणि उक्त अहवालाच्या पुरवणीमधे, लवाद व समेट अधिनियम, १९९६ यामध्ये सुधारणा करण्याबाबत ठोस स्वरुपाच्या सूचना आणि शिफारसी केल्या. संसदेने, लवाद व समेट (सुधारणा) अधिनियम, २०१५ संमत केला, जो दिनांक २३/१०/२०१५ रोजी व तेव्हापासून अंमलात आला आहे.

## संस्थात्मक लवाद विरुध्द तदर्थ लवाद

भारताच्या विधी आयोगाने आपल्या २४६ व्या अहवालात नोंदवल्याप्रमाणे, लवादाचे काम तदर्थ किंवा संस्थात्मक कार्यपध्दती व नियमानुसार चालविण्यात येते. सध्या, भारतात प्रचलीत असलेल्या तदर्थ लवादामधे पक्षकारांना, त्यांच्या विवादाच्या गरजेनुरुप योग्य असलेले त्यांचे स्वतःचे नियम आणि कार्यपध्दतीची निवड करता येते. या पध्दतीमध्ये, लवादाची निवड करण्यास एकतर प्रचंड खर्च व विलंब लागतो किंवा लवादाच्या क्षमतेच्या बाबतीत खूपच तडजोड करावी लागते.

दुसऱ्या बाजूला, संस्थात्मक लवाद ही कायमस्वरुपी असणारी अशी एक विशेषीकृत संस्था आहे की जी अशा संस्थेच्या नियमांद्वारे तरतूद केल्याप्रमाणे हस्तक्षेप करते आणि सहाय्य करण्याची व लवाद प्रक्रियेचे प्रशासन करण्याची कामे करते. संस्थात्मक लवादाचे काही सुस्पष्ट फायदे आहेत. पहिला म्हणजे, लवाद संस्था, संस्थेच्या नामिकेवरील अर्हतापात्र लवादाची तजवीज करु शकते. दुसरा म्हणजे, लवादाच्या कार्यवाहीचे नियम व कार्यपध्दती, संस्थेद्वारे निर्धारित केलेली असते. तिसरा म्हणजे, लवाद संस्था, लवादास सहाय्य करण्याकरिता सचिवालयीन आणि कर्मचारीवर्ग या स्वरुपात प्रशासकीय सहाय्य पुरवते. चौथा म्हणजे, लवाद संस्थेचा लवाद हा, पक्षकारांना लवाद शुल्कात करावा लागणारा प्रचंड खर्च वाचवितो जे शुल्क, विवादाचे स्वरुप आणि उपलब्ध करुन घ्यावयाच्या लवादांच्या सेवा विचारात घेऊन, पूर्व निर्धारित केले जाऊ शकते.

## आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्थात्मक लवाद

वेगवेगळया अधिकारीतेतील सरकारांनी, आंतरराष्ट्रीय लवाद केंद्रे स्थापन करण्याची आणि त्यांना चालना देण्याची त्यांची बांधीलकी स्वीकारली आहे. सिंगापूर आंतरराष्ट्रीय लवाद केंद्र, क्वालालंपूर प्रादेशिक लवाद केंद्र, दुबई आंतरराष्ट्रीय लवाद केंद्र, आंतरराष्ट्रीय लवाद केंद्राचे लंडन न्यायालय आणि हॉगकॉग आंतरराष्ट्रीय लवाद केंद्र हे, काही उल्लेखनीय आंतरराष्ट्रीय लवाद केंद्र असून ते संबंधित सरकारांच्या सहाय्याने अस्तित्वात आले आहेत.

## भारतातील संस्थात्मक लवाद

भारताच्या विधी आयोगाने आपल्या २४६ व्या अहवालामध्ये असे नमूद केले आहे की, भारतामध्ये संस्थात्मक लवादाचा विस्तार अत्यंत कमी असून खऱ्या अर्थाने, तो वेगाने सुरु झालेला नाही. आयोगाने, दिल्ली उच्च न्यायालयाचे आंतरराष्ट्रीय लवाद केंद्र (२००९), पंजाब-हरियाणा उच्च न्यायलयाचे लवाद केंद्र (२०१४), एफ.आय.सी.सी. (फिक्की) च्या समन्वयातून चालणारी भारतीय लवाद परिषद आणि नानी पालखीवाला लवाद केंद्र, चेन्नई यांच्या स्थापनेची आणि कार्याची नोंद घेतली आहे.

## संस्थात्मक लवाद केंद्र, मुंबई

आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्राचा एक अविभाज्य भाग म्हणून मुंबई येथे संस्थात्मक लवादाची गरज ही क्वचितच दुर्लक्षीत केली जाऊ शकते. आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्राशी जोडलेली लवाद संस्था ही मुलभूत आणि फायदेशीर सुध्दा आहे. जेव्हा विवादातील दोन्ही पक्षकार हे भारतातील नोंदणीकृत संस्था असतात किंवा जेव्हा दोन्ही पक्षकारांपैकी एका पक्षकाराची भारतात नोंदणी केलेली असते तेव्हा अशा संस्थातील लवादातील वाद देशाबाहेर जाणे टाळण्याकरिता मुंबई मध्ये जागतिक दर्जाचे संस्थात्मक लवाद केंद्र असणे बंधनकारक वाटते.

## धोरणात्मक उपक्रम

एक:- सुरुवातीला महाराष्ट्र शासनाने, त्यांच्या उल्लेखीत धोरणाचा एक भाग म्हणून संस्थात्मक लवादाला चालना देण्याचे प्रस्तावित केले आहे.

दोन:- महाराष्ट्र शासनातर्फे अथवा शासनाच्या वतीने कार्यान्वित होणाऱ्या विविध करारांत वाद सोडविण्याची जी यंत्रणा समाविष्ट करण्यात येते तिच्यामध्ये बरीच विविधता दिसून येते. एका प्रकरणी शासनाच्या अधिकाऱ्यांकडून निवाडा देण्याची पद्धत असते तर दुसऱ्या प्रकरणी शासनाचे अधिकारी लवाद असतात. काही थोड्याफार प्रकरणांत निवाडा देणारे व लवाद हे दोनही शासनाचे अधिकारीच असतात. इतर काही प्रकरणांत लवाद व समेट अधिनियम, १९९६ मधील तरतूदीनूसार. वाद सोडविण्यासाठी मानक लवाद खंड (standard arbitration clause) असतो. यास्तव ही विषमता दूर करुन लवादाद्वारे वाद निराकरणाची एकसमान पध्दत प्रस्तावित केली आहे.

**तीन:-** ज्या करारनाम्यांचे व्यावसायिक मूल्य रु. ५,००,००,०००/- (रुपये पाच कोटी) किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा सर्व शासकीय करारात म्हणजे राज्यपालांद्वारे अथवा त्यांच्या वतीने तसेच राज्य शासनाचा कंपन्या आणि अन्य शासकीय महामंडळे व शासकीय निगम यांच्या वतीने करण्यात येणाऱ्या संविदा व करारनाम्यात शिफारस केल्याप्रमाणे संस्थात्मक लवाद कलम अंतर्भूत करण्यात येईल ज्यामुळे वाद हा नामांकित भारतीय लवाद संस्थेकडे संदर्भित करता येईल (नमूना कलम परिशिष्ट 'A-1').

**चार:-** सध्या अस्तित्वात असणाऱ्या संविदा व करारनाम्यात, अन्य पक्षकारांच्या संमतीने वाद निराकरण संदर्भात अस्तित्वात असलेल्या कलमांमध्ये योग्य त्या सुधारणा करता येतील किंवा त्या कलमांऐवजी शिफारस करण्यात आलेले उपरोक्त कलम समाविष्ट करण्यात येईल, ज्यामुळे वाद मान्यताप्राप्त लवाद संस्थेकडे संदर्भित करता येईल व त्यानुसार अस्तित्वात असणाऱ्या संविदा व करारनाम्यांमध्ये वाद निराकरण यंत्रणे संदर्भातील तरतुदीमध्ये योग्य ते बदल/दुरुस्त्या करण्यात येतील.

**पाच:-** लवादास आरंभ झालेल्या अथवा आरंभ होणार आहे, अशा प्रकरणांत देखील पक्षकारांना प्रस्तावित संस्थात्मक लवाद यंत्रणेच्या पर्यायाकडे वळता येईल.

**सहा:-** सर्वसाधारणपणे, शासकीय सेवेतील अधिकाऱ्यांचा समावेश असणाऱ्या लवाद न्यायाधिकरणापुढे वाद संदर्भित करण्याचे कलम करारनाम्यांत व करारांत समाविष्ट नसावे.

**सात:-** महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळण्याकरिता लवाद संस्थेस वाद सोडविण्यासाठी जागतिक पातळीवरील सर्वोत्तम प्रघात असलेले आणि न्यायोचित, किफायतशीर व कालमर्यादेत वाद निराकरण करणारे नियम तयार करावे लागतील.

**आठ:-** सदर लवाद संस्थेने नियुक्त करावयाचे लवाद हे उच्च गुणवत्ताधारक, अत्युच्च प्रामाणिकपणा व विशेष ज्ञान असणारे असले पाहिजे.

**नऊ:-** लवाद केंद्राकडे सर्वोत्तम विशेष कौशल्य आकर्षित करण्यासाठी, लवाद केंद्र न्याय्य व पारदर्शक कार्यपध्दती विकसित करील.

**दहा:-** महाराष्ट्र शासन, मान्यता प्राप्त लवाद संस्थेसाठी आवश्यक ते पायाभूत सहाय्य, उत्तम दर्जाची माहिती व तंत्रज्ञान व्यवस्था तसेच पोषक वातावरण उपलब्ध होणे सुकर व्हावे यासाठी प्रयत्न करेल.

अकरा:- महाराष्ट्र शासन लवाद संस्थांना खालील निकषांवर मान्यता देईल:-

(१) लवाद संस्था ही भारतीय कायद्यानुसार कायदेशीर अस्तित्व असलेली असावी व तिचे मुख्यालय महाराष्ट्रामध्ये नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

(२) लवाद संस्थांना वाद सोडविण्यासाठी जागतिक पातळीवरील सर्वोत्तम प्रघात असलेले आणि न्याय्य, किफायतशीर व कालमर्यादेत वाद निराकरण करणारे नियम तयार करावे लागतील.

(३) सदर लवाद संस्थेने नियुक्त करावयाचे लवाद हे उच्च गुणवत्ताधारक, अत्युच्च प्रामाणिकपणा व विशेष ज्ञान असणारे असणे आवश्यक आहे.

(४) लवाद संस्थेमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची सुनावणीची सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे.

**बारा:-** वरील निकष पूर्ण करणाऱ्या इच्छुक लवाद संस्थांकडून शासन सुयोग्य पद्धतीचा अवलंब करून अर्ज मागवेल.

**तेरा:-** अशा संस्था, कार्यक्षम, न्याय्य व पारदर्शक पद्धतीने त्यांच्या सेवा पुरवीत नसतील अथवा मान्यताप्राप्त असल्याच्या विशेषाधिकाराचा दुरुपयोग करत असतील अशी शासनाची खात्री झाल्यास अथवा इतर कोणत्याही पुरेशा कारणास्तव शासन अशा संस्थांची मान्यता काढून घेण्याचे अधिकार राखून ठेवीत आहे.

**चौदा:-** मान्यताप्राप्त लवाद संस्था व महाराष्ट्र शासन, सदर संस्थात्मक लवाद केंद्र आंतरराष्ट्रीय दर्जाचे लवाद व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करुन देतील यासाठी प्रयत्नशील राहतील. त्याचबरोबर महाराष्ट्र शासन जरी मान्यताप्राप्त लवाद संस्थांच्या संवर्धनात व प्रगतीत पूर्णपणे सहभागी असले तरी देखील लवाद संस्थाच्या कामकाजाच्या स्वातंत्र्यावर व निपःक्षपातीपणावर परिणाम होणार नाही याची काळजी घेईल.

-----000-----

96/[illegible]

ANNEXURE 'A - 9'

MCIA MODEL CLAUSE

Any dispute arising out of or in connection with this contract, including any question regarding its existence, validity or termination, shall be referred to and finally resolved by arbitration in accordance with the Arbitration Rules of the Mumbai Centre for International Arbitration (**"MCIA Rules"**), which rules are deemed to be incorporated by reference in this clause.

The seat of the arbitration shall be ______________________.

The Tribunal shall consist of [one/three] arbitrator(s).

The language of the arbitration shall be English.

The law of this arbitration agreement shall be ______________________.

The Law Governing the contract shall be ______________________.